# 1980 नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीतील आर्थिक समस्या

**डॉ. नागनाथ लक्ष्मण आवले**

*मराठी विभाग, गुलबर्गा विद्यापीठ, कलबुर्गी – 585106*

**प्रस्तावना :**

1980 नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करतांना त्यामध्ये सावकारी समस्या, निसर्गाचा लहरीपणा, मालाला योग्य भाव न मिळणे या बाबीचा विचार केला आहे. ग्रामीण कादंबरीतील व्यक्तिरेखा, त्यांचे विचार, कृती यातून आर्थिक समस्या उद्‌भवतात. कारण शेतकरी सुखी झाला तरच शेतमजूर सुखी होतो. आणि हे दोघेही सुखी झाले तर देश सुखी होतो. पण शासनाकडे दूरदर्शीपणा आणि नियोजनाचा अभाव असल्यामुळे शेतीकडे दूर्लक्ष झाले आहे. त्यामुळे शेतीच्या आणि शेतकऱ्यांच्या समस्या आजही कायम आहेत. शेतकरी अतोनात कष्ट करतो. पण निसर्ग त्याला साथ देत नाही. दिवसरात्र कष्ट करूनही दोन वेळेची भाकर त्यांना मिळत नाही. भाकरीचा चंद्र शोधण्यात त्यांचे आयुष्य संपत आहे. सामान्य शेतकरी आणि शेतमजूर यांच्यावर तर नेहमीच उपासमार, भूक, भीती, अस्मामी संकटे यांचा वर्षाव सतत होत असतो. म्हणून आजही शेतकरी आर्थिक समस्यांना तोंड देतांना दिसतो कारण आजही महाराष्ट्रात जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी आहेत आणि जलसिंचनाचे क्षेत्र कमी आहे. बरेचसे शेतकरी अजूनही जुन्या परंपरागत बी –बीयाणांचा वापर करतात कारण त्यांना उत्तम असे बी – बीयाणे मिळत नाही, रासायनिक खते महाग असल्यामुळे त्याचा वापर शेतकरी कमी प्रमाणात करतात. सावकाराचे कर्ज काढून शेती करतात. त्यामुळे त्यांचे व्याजही जास्तच असते. त्यामुळे यांत्रिक अवजारे खरेदी करू शकत नाहीत. आणि ठिबक सिंचन, तुषर सिंचन, यांसारख्या जलसिंचन तंत्राचा वापर करू शकत नाहीत त्यामुळे पर्यायाने उत्पादन कमी निघते. निघालेला शेतीचा कच्चा माल लहाण शेतकरी शहरापर्यंत नेऊ शकत नाहीत. त्यामुळे ते आपला माल गावतच स्थानिक व्यापाऱ्यांना कमी भावात विकतात. त्यातून त्यांच्या दैंनदिन गरजा भागत नाहीत म्हणून त्याला आर्थिक समस्येला तोंड दयावे लागते.

**'हाल्या हाल्या दुधू दे!'**

या कादंबरीत ग्यानबा मुळे या शेतकऱ्याच्या आर्थिक दुरवस्थेचे चित्रण आले आहे. शेतीतून चांगले आणि पुरेसे उत्पन्न निघत नाही. त्यातून घर चालविणेच कठिण जाते. सोबाचा मामा स्वार्थी उद्देश ठेवून सोबाचे लग्न ठरवतो. सोबाच्या लग्नासाठी पैसा नसतो म्हणून शेतीचे एक वर्षाच्या मुदतीने

खरेदीपत्र लिहून देऊन सावकाराकडून कर्ज काढतो. एका वर्षात कर्ज फिटावे म्हणून उरलेल्या सर्व शेतीत एच. फोर कापूस लावतो. कापसाचे भरघोस उत्पन्न मिळाले तर सावकाराच्या हातात गेलेली शेती सोडविता येईल असे वाटते. प्रतिकूल परिस्थितीत पैशाची ऐपत नसतानाही या सर्वांतून मार्ग काढून तो पळाटी जगवितो. पण सोबाच्या सासऱ्याकडून आणेलेले एच. फोरचे सर्व बी नर जातीचे निघते. त्यामुळे निघालेल्या उत्पन्नातून त्याला काहीच उत्पन्न होत नाही. उलट त्याने केलेला सर्व खर्च व मेहनत वाया जाते.

तेच सोसायटी भरण्यासाठी विश्वासाने कारकुनाच्या हाती पाचशे रूपये ठेवतो. पण कारकून पाचशे रूपये घेऊन पावती देत नाही फसवतो. त्यामुळे त्याच्या घराला जप्तीची वेळ येते. आणि दुसरीकडे जमिनीच्या मोजणी प्रकरणी सावकार दंडूकशाहीने न्यानबाची जास्त जमीन बळकावतो आणि त्यामध्ये भर म्हणून सावकार न्यानबाला पोरांकडून बेदम मार देतो आणि कोर्ट कचेरीची धमकी देतो. सर्वसामान्य शेतकऱ्याला सावकार दडपशाही व लुच्चेगिरीने फसवून कसे उद्ध्वस्त करतात, या सर्वांचे चित्रण या कादंबरीतून आले आहे.

तसेच ज्ञानबा जेव्हा शेतीतील गाडीभर माल बाजारात विकण्यासाठी जात असतो तेंव्हा अनसा स्वतःसाठी एक लुगडे आणि मुलांसाठी कपडे आणायला सांगते. पण बाजारात मालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे घेतलेले कर्जे, हमाली आणि दलाली यातच त्याचे सर्व पैसे खर्च होतात. नवीन साडी, पोरासाठी कपडे घेणे होत नाही. म्हणून फाटलेल्या लुगड्यांना व धोतरांना दंड घालून आणि पोरांच्या चड्डीला ठिगळे लावून घालावे लागते. यावरून असे लक्षात येते की, पैशाअभावी नडलेल्या शेतकऱ्यांना जवळचे नातेवाईक आणि सावकार फसवून त्याची शेती बळकावतात. त्यामुळे शेतकरी कुटुंबाला दारिद्रात जीवन जगावे लागते.

### विषवृक्षाच्या मुळ्या

या कादंबरीतून सावकार आणि सोसायटीचे मेंबर्स शेतकऱ्यांना कशा प्रकारे लुटतात याचे चित्रण आले आहे. कर्जवाटपामध्ये सहकारी सोसायटीचे अधिकारी घोटाळा करून शेतकऱ्यांना लुटतात. आपल्या स्वार्थासाठी हे भ्रष्ट अधिकारी हरामीची कमाई खातात. बॅंकेमधील काही अधिकारीसुध्दा सावकारीचा धंदा करतात. अधिकारी नोकरदार असल्यामुळे त्यांच्याकडे सावकारी करण्यासाठी पैसा नसतो पण हे साहेबलोक पगारीतून सावकारी करीत नाहीत तर सोसायटीच्या जमा रक्कमेतून सावकारी करतात. बॅंकेतील तिजोरीची रक्कम कोणी तपासायला येत नसल्यामुळे असे भ्रष्ट अधिकारी त्यातील पैसा व्याजाने देतात, हे पुढील संदर्भावरून लक्षात येते. विरप्पा विश्वानला सांगतो, "अवो नुस्ता बोगस येव्हार. अमुक सुसायटीची येवढी येवढी रक्कम जमा निसती पावती

फाडायची. तिजोरी तपासली तं तेवढी रक्कम कमीच असणार पर रोज रक्कम तपासाय कोन येतंय? मग आठ दिसांनी डिमांड पास करून घ्यायचं जमवून पेमेंट झााल की ह्येंचा खिसा गरम." अशाप्रकारे शेतकरी हा सतत कर्जाच्या बोजाखाली दबत असतो. सोसायटी आणि सावकार यांच्याकडून कर्ज घेऊन पेरणी व घरातील आर्थिक अडचण भागवीत असतो. पण सा नडलेल्या भोळ्याभाबड्या शेतकऱ्यांकडून खळ्याच्या वेळेस हे लोक जी वसुली करतात, ती वसुली नसून तो धंदात करतात. सावकार आणि सोसायटीचे अधिकारी एकत्र येऊन अतिशय नीच दर्जाची वसुली करतात. सावकार आणि सोसायटीचे अधिकारी शेतकऱ्यांना खळ्यावर जाऊन तगादा लावतात. मग वैतागून वेळ भागवावी म्हणून शेतकरी परत सावकाराकडून पैसे काढतो व सोसायटी भरतो. आणि सावकार खळ्यात बसून मागची पुढची सर्व वसुली करतो. आणि शेतकऱ्याला हलाखीचे, दारिद्राचे जीवन जगायला भाग पाडतो.

**असं जगणं तोलाचं :**

या कादंबरीतील  हरिबा हा आपल्या मुलांच्या लग्नासाठी विष्णू सावकाराकडून 200 रूपयांचे कर्ज शेती गहान ठेवून घेतो आणि तेथूनच या सुखी संसाराची वाताहात सुरू होते. "मानवी जीवनातील मुलभूत गरजासुध्दा या शेती व्यवसायातून पूर्ण होत नाहीत. भूकेच्या पलीकडे कोणतीही गोष्ट करायची म्हटली तरी त्याला सावकारी पाशाला बळी पडावे लागते." ही गहाण ठेवलेली शेती हडप करण्यासाठी विष्णू सावकार हरिबाचा छळ करतो. तेंव्हा हरिबाचा मोठा मुलगा गोपाळा हा शिक्षक असतो. आपल्या पगारीतून तो मळा सोडवून घेतो. मळा घेता आला नाही म्हणून विष्णू सावकार कुटिल डाव रचतो. हरिबाचा मुलगा हाणमू जेंव्हा विष खाऊन मरतो, तेंव्हा त्याच्या घरच्यावरच खुनाचा आरोप लावून विष्णू सावकार या गरीब कुटुंबाला देशोधडीला लावण्याचा प्रयत्न करतो. हरिबाने भावाच्या दोन्ही मुलांना लहानाचे मोठे केलेले असते. हरिबा आणि त्याच्या पुतण्यात विष्णु सावकार फूट पाडतो. म्हणून ही दोन मुले हाणमूची राख सावडायला येत नाहीत. म्हणून गावातील कोणीही येत नाही. कारण विष्णू सावकाराच्या म्हणण्यानूसार सर्वांना वाटते की, कासानेच आपल्या सावत्र मुलाचा काटा काढला. विष्णु सावकार पोलीस पाटलाला आणि भावकीच्या दोंन्ही  मुलांा घेऊन पंचनामा करण्यासाठी येतो. या विष्णू सावकाराच्या कुटील डावामुळे एका गरीब कष्ट करून खाणाऱ्या शेतकरी कुटुंबाला आपले दोन बैल आणि एक बैलगाडी विकावी लागते. यातून या कुटुंबाची वाताहत सुरू होते. या वाताहतीला कारणीभूत विष्णू सावकार असतो.

कादंबरीच्या सुरूवातीलाच हरिबाला विष्णू सावकाराकडून आपल्या वाड्यावर बोलावून घेतो आणि वाड्यात जमलेले केशव पाटील, माणिकराव, पोलीस पाटील, चेंगट कोंडिबा या गावातील प्रतिष्ठित

अशा माणसांसमोर हरिबाची फजिती करतो ही गोष्ट हरिबा व त्याच्या मुलांच्या मनाला लागते तेव्हा नामू म्हणतो, "अण्णा! आपुण कुणबटाच्या पोटाला जलम घेटलो त्या दिवशीच हे सारं आपल्यासंग आलं गा. पण हेबी दिवस पालटतील आज ना उद्या आन् ह्या कारबाऱ्याचं तर आसं उताणं राज अजून कितीदा चालायच म्हणावं?" शेतकऱ्यांना घरच्या दारिद्रामुळे आणि आर्थिक विदारक परिस्थितीमुळे सावकार शेतकऱ्याला लुटण्यासाठी, त्याचे शोषण करण्यासाठी त्रास देण्यासाठीच असतो असे वाटते. सावकाराकडून जमीनदाराकडून होत असणारे शेतकऱ्यांचे शोषण जोपर्यंत संपत नाही. तोपर्यंत शेतकऱ्याला चांगले दिवस येतील, हे सांगता येत नाही. गरजेपोटी शेतकरी कर्ज घेतो आणि लाचार होतो. या लाचारीतून सावकार शेतकऱ्याला लुबाडतो, त्याची फसवणूक करतो. याचं चित्र 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीतून आले आहे.

**झोंबी :**

या कादंबरीमध्ये घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे आनंद यादव आणि त्यांच्या कुटुंबीयांना दारिद्रात जीवन जगावे लागते. घरच्या दारिद्राअभावी, लग्नात हुंडा देता येत नाही म्हणून यादवांची आई त्यांच्या बहिणींना पाहायला आलेल्या कशाही मुलांसोबत लग्न लावून देते. आनंद यादवांची बहिण धोंडूबाई ही दिसायला अतिशय सुंदर होती. पण तिलाही एका रोजगाऱ्याला द्यावी लागते. घरच्या आर्थिक दारिद्रामुळे मुलांना शाळेत पाठविणे हे शेतकऱ्यांना चैनीचे वाटत होते. म्हणून आनंद यादव जेंव्हा शाळेत जायचं म्हणतात तेव्हा त्याचे वडील शाळेत घालतात. पण चौथीपर्यंत शिकण्यासाठी! पुढे आनंद यादवांना विरोध करतात. का तर शाळेत गेल्यामुळे घरचे आणि शेतीचे काम बुडत असते. आपल्या मुलाने हातात पाटी घेण्याऐवजी नांगर किंवा बैलांचा कासरा धरावा असे वाटते. तेव्हा शेतीचे सर्व बेसुमार शारीरिक कष्ट करत आनंद यादव शिकतात पण त्याचे बालपण हरवते, "ज्या बालपणीचा काळ सुखाचा असल्याची गाणी गायली जातात, ते बालपण रम्य असतं म्हणतात ते त्याला कधी भेटलचं नाही. शाळेच्या दाखल्यावर बाल्याचा फक्त लेखी पुरावा होता. रोजचा दिवस नवी यातना देण्यासाठी उगवायचा, ही शिक्षा ह्या कोवळ्या भावंडाला भोगायला लागावी, असा गुन्हा कोणता? दारिद्र, आर्थिक दारिद्र आणि त्या दारिद्रासोबत येणारं मानसिक दारिद्र. दारिद्र, दारिद्र ह्याची हाकाटी ऐकली पण दारिद्राचे ऐवढे दशावतार प्रथम लक्षात आले. दिवसभर अन्नाच्या शोधात फिरणारी जनावरे आणि ही माणसे ह्यांच्या जगण्यात फरक नव्हता. जगण्याचे सारे प्रयोजन भूक भागावयाला हव्या असलेल्या भाकरीभोवती साठवलेले होते, हे वयाच्या कुठल्याही वर्षी मरण आले तरी सुटला किंवा सुटली. खायला मागणारे एक तोंड कमी झाले ह्याखेरीज भोवतालच्या माणसांची दुसरी कुठलीही प्रतिक्रिया होऊ नये, रात्रंदिवस कष्ट करून दोन

वेळची भाकरी न मिळणाऱ्या त्या आर्थिक स्तरांतल्या हजारो शेतकरी मुलांचे आयुष्य ह्याच काट्याकुट्यांनी भरलेले आहे." हे शेतकऱ्यांचे आजचे जीवन आहे. पूर्वी आणि आज परिस्थितीमध्ये फरक पडलेला दिसून येत नाही.

**गणगोत :**

या कादंबरीतील पुष्पीचे लग्न पैशाअभावी जमत नाही. घरात दारिद्र्य असल्यामुळे तिच्या आईवडिलांना एका वयस्कर माणसासोबत तिचे लग्न लावून दिलेले असते. नवरा मुलगा कसा असतो तर "अंगात धोतर – आंगडं डोक्यावर पटका आन् मिशावाला बी हे." असे नवरदेवाचे रूप पाहून पुष्पी लग्न संपेपर्यंत रडत होती. आजही शेतकरी कुटुंबात भयानक दारिद्र्य आहे. सतत दुष्काळामुळे शेतीमध्ये उत्पन्न कमी आणि मालाला बाजारभाव योग्य मिळत नाही म्हणून शेतकऱ्यांना शेतीवर कर्ज काढून मुलामुलींचे लग्न करावे लागते. शेतमजूरांना तर कर्जही मिळत नाही. दुसऱ्यांच्या शेतीमध्ये किंवा अन्य ठिकाणी जाऊन रोजगार करावा लागतो. त्यातून पोटाला पोटभर आणि अंगाला पुरता कपडाही मिळत नसेल तर मुलामुलींच्या लग्नासाठी पैसा आणि हुंडा कोठून आणणार! त्यासाठी आईवडिलांची इच्छा नसतांना पण वयस्कर माणसासोबत आपल्या सुंदर, लाडक्या, वयाने कमी असलेल्या मुलींचे लग्न लावून दिले जाते.

**चारापाणी :**

या कादंबरीतून कोरडवाहू शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे, त्यांच्या दारिद्राचे चित्रण आले आहे. दैनंदिन गरजा भागविण्यासाठी त्यांच्याकडे पैसा नसतो. बायका – मुलांना कपडे घ्यायचे असतील तर घरात खाण्यासाठी ठेवलेले धान्य विकावे लागते. कोरडवाहू शेतकऱ्याकडे कोणी गांभीर्याने पाहत नाही. ग्रामीण भागातच कॅनाल भागातील शेतकरी बागायती करून श्रीमंत होत आहेत तर कोरडवाहू शेतकरी अधिक अधिक दारिद्री बनत आहे. शेतकऱ्या – शेतकऱ्यामध्येसूध्दा अशी प्रचंड आर्थिक विषमता दिसून येते. कोरडवाहू जिरायती शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थिबद्दलचे कादंबरीतील वर्णन पाहण्यासारखे आहे. "जेमतेम जीवन जगण्यातून पत्तीला देखील शेतकऱ्याकडे पैसा नाही. बायकापोरांना नवे कपडे घालायचे असतील तरी घरातील धान्याचे पोते घेऊन त्या मोढ्यावर घेऊन जावे लागते." यावरून असे लक्षात येते की, शेतकऱ्यांच्या घरी पैसा पाहायला मिळत नसल्यामुळे आर्थिक चणचण भासते. प्रत्येक गोष्टीसाठी घरातील धान्य विकूनच दैनंदिन गरजा भागवाव्या लागतात.

**रानखळगी :**

रानखळगीतून एका लहान शेतकरी कुटुंबाची कहाणी आली आहे. हे कुटुंब पोटापुरते मिळवून

आपला उदरनिर्वाह भागवीत असते. आवश्यकतेपेक्षा जास्त पाऊस पडल्याने या कुटुंबाचे हाल होतात तसेच जनावरांचेही हाल होतात. जास्त पावसामुळे शेती नापीक होऊन शेतकऱ्यांना दुःष्काळी कामाला जावे लागते. सतत तीन वर्ष दुष्काळ पडतो. खूप कष्ट करूनही शेतकऱ्यांना अर्धपोटी राहावे लागते. सणावरांसाठी त्यांना दररोजच्या दिवसासारखाच असतो याचे वास्तव चित्रण या कादंबरीतून आले आहे. "दिवाळीचे कोरडे दिवे वातीसंग धुपूनच इझले व्हते. जिथं कोरड्याशाला धारभर तेलाची पंचीत व्हती तिथं दिवाळीच्या दिव्याचं पोट कसं भरणार व्हतं? कशासाठी व्हते हे सण? कोणासाठी व्हते. . . ? कायीच कळत नव्हतं." शेतकरी आणि शेतकमजुरांचे पोट हातावरचे असल्यामुळे कोणताही सण असला तरी त्यांना शेतीत राबायला किंवा दुष्काळी कामाला जावे लागते. अन्यथा त्यांची चूल पेटत नाही. दिवाळीच्या सणाला शेतकऱ्यांच्या मुलांना नवीन कपडे फटाके फोडायला मिळत नाहीत. म्हणून दुसऱ्यांनी फोडलेल्या फटाक्यांच्या आवाजाने आनंदी होतात. याचे चित्रण या कादंबरीत आले आहे.

**बारोमास :**

विदर्भातील शेती ही पावसावर अवलंबून आहे. वेळेवर पाऊस न पडल्यामुळे या कादंबरीतून रावसाहेबांना पाच हजार रूप्ये कर्ज बालूशेठकडून घ्यावे लागते. धुके, गारपीठ पडल्याने पिकांचे नुकसान होते. शेतकऱ्यांचा फवारणीसाठी खर्च वाढतो जास्त पावसामुळे तण भरपूर वाढते. तेव्हा मजूर लोक शेतकऱ्यांच्या अडचणीचा फायदा घेऊन जास्त मजुरी मागातात. आणि शेतकऱ्यांना कसे आर्थिक कोंडीत पकडतात,ह्यांचे वर्णन या कादंबरीतून आलेले आहे. सकाळी उछल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आर्थिक चिंता लागलेली असते. तसे पाहिले तर त्यांचे संपूर्ण आयुष्यच चिंतेत जाते. म्हणून या कादंबरीतील तेजेराव खपके म्हणतो, "शेतकऱ्याच्या पोराला जवानीच येत नाही. त्याचं डायरेक्ट प्रमोशन होत. बालपणापासून त्याला चिंताच एवढ्या लागतात की त्यो जवानीत म्हातारा होऊन जातो. त्याचा रोजचा दिवस चिंतेचा आज काय त बियाची सोय लागलं का? किराणा, कपडे, लगन कार्य, मरणं–धरणं अन् सम्दं दुःख थांबत कुठी? पैशाजवळ . . . . शेतकऱ्याजवळ पैसाच येत नाही."[13] आणि पैसा आला तर त्या पैशाला हजार वाटा असतात. पैस पुरत नसल्यामुळे वेळप्रसंगी त्यांना सावकाराकडून किंवा सोसायटीचे कर्ज काढावे लागते. कारण दोन्ही हंगाम धुळीने माखून गेलेले असतात. देणेकरी तगादा लावतात. बॅकवाले नोटिसा पाठवितात. त्यामुळे कर्जबाजारी शेतकरी तोंड लपवून फिरतो."खरे म्हणजे शेतकरी हा धान्य पिकविणारा, कापूस उत्पादन करणारा जरी असला तरी त्याच्या घरात दारिद्रच असते. अंबावरचे कपडे फाटलेले, अन्नाची मारामार चालेलेली असते. या कादंबरीतील अनिताला उन्हाळ्याच्या दिवसात भर बारा

वाजता चुलीत वेळू घालून स्वयंपाक रावा लागतो. ती पोस्ट ग्रॅज्युएट नवऱ्याची बायको असते. पण तिच्या वाट्याला दारिद्र्यच जुंपलेले असते."[14] असे एकनाथच्या घरात अठराविश्वे दारिद्र्य असल्यामुळे डोनेशनच्या अभावी एकनाथ व मधू या दोन्ही शिकलेल्या भावांना नोकरी लागत नाही म्हणून एकनाथ शेतीमध्ये काम करतो तर मधू अनैतिक मार्ग स्वीकारतो यावरून असे लक्षात येते की, आजचा शेतकरी वेगवेगळया कारणाने समाजात लाचारीने जीवन जगत आहे. आर्थिक समस्येमुळे तो सावकारी किंवा इतरत्र कर्ज काढतो आणि आयुष्यभर फेडत बसतो. सतत चिंतेत त्याचे आयुष्य संपून जाते. जीवनात त्याला कोणत्याही प्रकारचे सुख मिळत नाही.

**संदर्भसूची :**

1 वासुदेव मुलाटे 'विषवृक्षाच्या मुळ्या', प्रकाशक – मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती 1 सप्टेबर 1989.

2 डॉ. गणेश मोहिते 'समकालीन कृषक समस्याग्रस्त जगण्याचे प्रतिबिंब 'असं जगणं तोलाचं', शेषेराव मोहितेंची कादंबरी स्वरूप आणि जाणिवा', संपादक डॉ.संगीता मोरे, प्रकाशक व्यंकटराव मोरे,मैत्री प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती नोव्हें 20011.

3 शेषराव मोहिते 'असं जगणं तोलाचं', प्रकाशक डॉ. सु.रा.देशमुख, देशमुख आणि कंपनी सदाशिव पेठ, पुणे , आवृत्ती1994.

4 आनंद यादव 'झोंबी', प्रकाशक सुनील अनिल मेहता पब्लिकेशन हाऊस, सदाशिव पेठ, पुणे , आवृत्ती जून 2010.

5 गणेश आवटे 'गणगोत', साकेत प्रकाशन औरंगाबाद प्रथमावृत्ती 1984.

6 डॉ.रा.रं.बोराडे 'चारापाणी', मेहता पब्लिकेशन हाऊस,, पुणे , व्दितीय आवृत्ती 1998.

7 डॉ.भीमराव वाघचौरे 'रानखळगी', प्रकाशक साकेत बाबा भांड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, तृतीयावृत्ती 2007

8 सदानंद देशमुख 'बारोमास', प्रकाशक अनिरूध्द अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे तृतीयावृत्ती 2007

9 प्रा. डॉ. संगीता घुगे '1991 नंतरची वैदर्भीय ग्रामीण कादंबरी', 'अक्षरगाथा', वर्ष दुसरे, पहिला दुसरा जोड अंक, 10 जंलै 2011 नांदेड, संपादक डॉ.मा.मा.जाधव